ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ पुणे, बुधवार १६ मार्च, १९६६ अंक ६

## विविध माहिती

**रशियाकडून ट्रॅक्टर्सची आयात**—येत्या तीन वर्षांच्या अवधीत भारत रशिआकडून ६,००० यंत्रचलित नांगर आयात करण्याची शक्यता आहे. भारत आणि रशिया ह्यांच्यांत नुकताच एक व्यापारी करार करण्यात आला आहे. करारा-प्रमाणे रशिया रुपयाच्या चलनाच्या मोबदल्यात यंत्रचलित नांगर पुरविणार आहे. यंत्रचलित नांगरांशिवाय इतर प्रकारची अवजारेही रशियाकडून आयात करण्यात येणार आहेत. मात्र त्यांची संख्या व प्रकार ह्याबाबत भारत सरकारने अद्याप निर्णय घेतलेला नाही. जी यंत्रसामग्री भारतात तयार होऊ शकत नाही तेवढीच रशियातून आणण्याचे सरकारचे धोरण आहे.

**रशियाकडून हेलिकॉप्टर्सचा पुरवठा**—रशिया आणि भारत ह्यांच्या दरम्यान ४० हेलिकॉप्टर्स पुरविण्याबाबत करार करण्यात आला आहे. ह्या विमानांसाठी रशियाला ४५ लाख डॉलर्सची रक्कम द्यावी लागेल. प्रत्येक हेलिकॉप्टर १॥ टन वजन वाहून नेऊ शकेल. त्याची गती तासाला २०० किलोमीटर इतकी असेल. युद्धप्रसंगी अवघड प्रदेशांत लष्करी वाहतूक करण्यासाठी हेलिकॉप्टर्सचा विशेष उपयोग होतो.

**१८ देशांकडून भारताला मदत**—भारताच्या दुष्काळी परिस्थितीत त्याला मदत करण्याचे आवाहन अमेरिकेने केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला असून १८ देश मदती-च्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. सर्व देश आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेची अन्न व शेती उपसंघटना मिळून ३३ कोटी रुपयांची मदत भारताला देणार आहेत. अमेरिकेने भारताला एकूण ६५ लाख टन अन्नधान्य देण्याचे कबूल केले आहे.

**घरांच्या योजनांसाठी कर्जे**—आयुर्विमा कॉर्पोरेशनने राज्यातील घरबांधणीच्या योजनांसाठी कर्जे द्यावी म्हणून कॉर्पो-रेशन आणि नियोजन समिती ह्यांच्यांत वाटाघाटी चालू होत्या. १९६६-६७ ह्या आर्थिक वर्षात कॉर्पोरेशनने १२ कोटी रुपयांची रक्कम घरबांधणी योजनांसाठी द्यावयाचे मान्य केले आहे. त्यामागील आर्थिक वर्षात १५ कोटी रुपयांची रक्कम देण्यात आली होती.

**जपानी तज्ज्ञ शिक्षण देण्यास तयार**—टोकिओमधील एका आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संघटनेने भारताला अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याच्या कामी मदत करण्याची तयारी दाखविली आहे. संघटना दोन हजार एंजिनिअर्स, शेती व इतर तज्ज्ञ भारतात पाठविण्यास तयार आहे. हे तज्ज्ञ भारतातील खेड्यांत जाऊन शेतकऱ्यांना शेतीच्या सुधारलेल्या पद्धती शिकतील. भारत-सरकार ह्या सहकार्याबद्दल विचार करीत आहे.

**केरळमध्ये विजेच्या पुरवठ्यात कपात**—केरळमधील जलविद्युतकेंद्रांत तयार होणारी वीज धरणातील पाण्याच्या अपुऱ्या साठ्यामुळे संपूर्णपणे बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. फेब्रुवारी महिन्यातील धरणातील पाण्याची पातळी एकदम खूप कमी झाल्यामुळे सध्या निर्माण करण्यात येणारी मर्यादित प्रमाणावरील वीजही पंधरा दिवसांनंतर निर्माण न करता येण्याची शक्यता आहे.

**भडोचजवळ सिमेंटचा कारखाना**—भडोचजवळ १५ लाख रुपये प्राथमिक भांडवल लागणारा एक सिमेंटचा कार-खाना उभारण्यात येणार आहे. उभारणी झाल्यापासून १० ते १२ वर्षांच्या कालात कारखान्याची संपूर्ण उत्पादनक्षमता कारणी लागेल आणि दरसाल १२ ते १५ लाख टन सिमेंटचे उत्पादन होऊ लागेल. दक्षिण गुजरात राज्यांतील नर्मदा व उकाई योजनांना लागणारे सिमेंट कारखाना पुरवू शकेल.

**नव्या विमानतळाची जरुरी**—गेल्या महिन्यांत जपान-मध्ये तीन गंभीर स्वरूपाचे विमानअपघात झाले. त्यांपैकी दोन टोकिओच्या विमानतळावर उतरणाऱ्या विमानांना झाले. टोकिओच्या उपसागरात धुके पडण्याचे प्रसंग फार येतात. त्यामुळे विमानांच्या वाहतुकीला धोका उत्पन्न होतो. हा धोका टाळण्यासाठी परदेशांतून येणाऱ्या विमानासाठी एक नवाच तळ उभारण्याची जरुरी उत्पन्न झाली आहे.

**कुटुंबनियोजनासाठी १३ कोटी**—१९६६-६७ सालच्या अंदाजपत्रकात कुटुंबनियोजनाच्या कामासाठी १३ कोटी रुप-यांची तरतूद करण्यात आली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या सर्व काळात ह्या कामासाठी फक्त २५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ह्या बाबी-साठी ९५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

**सिमेंटचे नवे कारखाने**—सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्या संघटनेने सार्वजनिक मालकीच्या विभागात तीन नवे सिमेंटचे कारखाने काढण्याचे ठरविले आहे. कारखान्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीची मागणी नोंदविण्यात आली आहे. १९६६-६७ मध्ये परदेशांतून यंत्रसामग्री आयात करण्यासाठी ३.५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

**भारतामधून तांदुळाची निर्यात**—नोव्हेंबर १९६५ पासून जानेवारी १९६६ पर्यंतच्या कालात भारतामधून ८६५ टन तांदूळ परदेशांत निर्यात करण्यात आला, अशी माहिती राज्यसभेत सरकारतर्फे देण्यात आली आहे. हा तांदूळ बसुमतीसारख्या चांगल्या दर्जाचा असून तो एडन व इतर ठिकाणी राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या वापरासाठी देशाबाहेर पाठविण्यात आला.

## दि बेळगाव बँक लि.

दि बेळगाव बँक लि. कडील ठेवीत १९६५ मध्ये २०% वाढ होऊन ठेवींची रक्कम २·६७ कोटी रु. वरून ३·२१ कोटी रु. वर गेली. पोंडा ( गोवा ) आणि मुंबई येथे बँकेच्या शाखा अहवालाचे वर्षी उघडण्यात येऊन, शाखांची एकूण संख्या ३८ झाली. स्टाफला बोनस देऊन, एकूण २,४२,३१५ रु. नफा उरला. भागधारकांना ९% डिव्हिडंड दिले जाईल. बँकेची वार्षिक सभा २९ मार्च रोजी आहे.

### वाइ अर्बन बँकेची पाचगणीत शाखा सुरू


वाई अर्बन को. बँकेच्या पाचगणी शाखेचे उद्घाटन संजीवन विद्यालयाचे प्रिन्सिपॉल श्री. शरद कृष्ण पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. हा समारंभ पाचगणी नगरपालिकेच्या सभागृहात झाला. याप्रसंगी पांचगणीतील २५ व्यापाऱ्यांनी वाई अर्बन बँकेत खाती उघडली. समारंभास व्यापारी व विविध क्षेत्रांतील बहुसंख्य लोक उपस्थित होते.

### मध्यप्रदेशातील लोखंडाच्या नव्या खाणी

राष्ट्रीय खनिज विकास मंडळाने मध्यप्रदेशात लोखंडाच्या दोन नव्या खाणी उघडण्याचे ठरविले आहे. प्रत्येक खाणीतून दरसाल ४० लाख टन लोखंडाचे खनिज काढण्यात येईल आणि जपानला निर्यात करण्यात येईल. ह्या दोन्ही खाणी आधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्ज करण्यात येणार आहेत. एका खाणीच्या विकासासाठी १५·७५ कोटी रुपये आणि दुसऱ्या खाणीच्या विकासासाठी २०·१८ कोटी रुपये खर्च येणार आहे. १९६४ साली भारतामधील लोखंडाच्या खनिजाचे उत्पादन २·१३ कोटी टन झाले. लोखंडाच्या खनिजाच्या उत्पादनात गोव्याचा अनुक्रम पहिला लागला. त्यानंतर ओरिसा, बिहार, म्हैसूर, मध्यप्रदेश, आंध्र, मद्रास, इत्यादी राज्यांचे अनुक्रम लागतात.

### तुंगभद्रा पोलाद कारखाना मध्यवर्ती सरकारचा होणार

तुंगभद्रा पोलाद कारखान्यात ५१ लाख रुपये भांडवल गुंतवून त्या कारखान्याचा ताबा सर्वस्वी आपल्याकडे घेण्याचे मध्यवर्ती सरकारने ठरविले आहे. पुढील महिन्यात मध्यवर्ती सरकार ५१ लाख रुपयांचे ऑर्डिनरी भाग घेऊन कारखाना आपल्या अखत्यारीत घेईल. सध्या हा आंध्र आणि म्हैसूर राज्यांच्या समान मालकीचा आहे. अलाहाबाद येथे बांधकामासाठी लागणाऱ्या पोलादी सामानाचा एक सरकारी मालकीचा कारखाना आहे. त्या कारखान्याच्या धर्तीवर तुंगभद्रा कारखान्याचा विस्तार करण्याचा सरकारचा विचार आहे. कारखाना ताब्यात घेण्यापूर्वी काही कायदेशीर तरतुदी करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी दोन्ही राज्यांच्या सरकारांना मध्यवर्ती सरकारकडून कळविण्यात आले आहे.



# अर्थ

बुधवार, १६ मार्च, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतात अन्नाची टंचाई आहे; दुष्काळ नाही

भारतामध्ये पावसापाण्याच्या अभावी निर्माण झालेली परिस्थिती अन्नटंचाईची आहे; दुष्काळाची नाही, असे मत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती संघटनेचे संचालक मि. बी. आर. सेन ह्यांनी व्यक्त केले आहे. १९४३ साली बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळात ३० लाख माणसे उपासमारीने मृत्युमुखी पडली होती. त्याचा उल्लेख करून ते म्हणाले की तीव्र स्वरूपाची अन्नटंचाई असल्यामुळे भारताची अन्नधान्याची गरज अतिशय तातडीची आहे. भारतात दुष्काळ नाही अशा आशयाची काही विधाने अलीकडे करण्यात आली आहेत. पण, त्यामुळे भारतातल्या अन्नपरिस्थितीसंबंधी परदेशात गैरसमज होण्याचा संभव आहे. भारत सरकार दुष्काळ हा शब्द पुन्हा पुन्हा वापरण्यास तयार नाही; कारण, त्यामुळे घबराटीचे वातावरण उत्पन्न होण्याची शक्यता असते. अन्नधान्याची गरज रोजच वाढत असल्यामुळे येत्या जुलै महिन्यापर्यंत अधिकात अधिक धान्य आयात करण्याची जरुरी आहे. ह्या दृष्टीने सर्वात कठीण महिने मे, जून आणि जुलै हे आहेत. कारण, तोपर्यंत उन्हाळी पिके हाती पडणार नाहीत. भारत सरकारच्या अंदाजाप्रमाणे येत्या काही महिन्यांतील अन्नधान्याची मागणी पुरी करण्यासाठी १ कोटी ते १ कोटी, २० लाख अन्नधान्याची जरुरी आहे. भारत सरकार आपल्या परीने परिस्थितीला तोंड देण्याची शिकस्त करीत आहे. परंतु जसजसा काळ जाईल तसतसा धान्याचा साठा कमी होत जाईल आणि परिस्थिती अधिक नाजूक होईल. भारताच्या अडचणीच्या परिस्थितीत त्याला मदत करण्यासाठी अनेक देश पुढे आलेले आहेत. हॉलंड, फ्रान्स, इटाली, स्वित्झरलंडसारख्या देशांनी तर मदत देण्यासाठी खास प्रयत्न केले आहेत.

---

## अविकसित देशांच्या विकासासाठी लागणारा पैसा

जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. जॉर्ज बॉल संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक मंडळापुढे बोलताना म्हणाले की अविकसित देशांनी आपले विकासाचे कार्यक्रम आखताना दोन गोष्टींकडे अधिक लक्ष देणे अगत्याचे आहे. पहिली गोष्ट म्हणजे कार्यक्रम स्पष्ट असले पाहिजेत आणि ते अंमलात आणण्याच्या तांतडीची छाया त्यात प्रतिबिंबित झालेली असली पाहिजे. ही पथ्ये पाळण्यात आली तर औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशांकडून भांडवल मिळविणे अधिक सुलभ होईल. सध्या अविकसित देश विकासासाठी जितका पैसा वापरीत आहेत त्याच्यापेक्षा किती तरी अधिक पैशाची त्यांना गरज आहे. ह्या पुढील प्रत्येक पांच वर्षांच्या कालात ३०० ते ४०० कोटी डॉलर्स अधिक भांडवलाची त्यांना गरज लागेल. पण, भांडवलाच्या गरजेचा नुसता अंदाज बांधून ते उपलब्ध होणार नाही. अविकसित देश आपल्या गरजा योग्य, निश्चित अशा विकास कार्यक्रमांच्या द्वारा जितक्या ठळकपणे मांडतील तितके ते हवे आहे. अर्थात अशा कार्यक्रमांच्या द्वारा लोकांची उत्पादनक्षमता वाढीस लागणार असली पाहिजे. जागतिक बँक अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या शोधातच आहे. अविकसित देशांतील रासायनिक खतांचे उत्पादन वाढविण्याच्या कामी मदत देण्यास जागतिक बँकेची तयारी आहे. ही मदत सार्वजनिक आणि खाजगी मालकीच्या विभागांतील अशा दोन्ही कारखान्यांना देण्यात येईल. अशी मदत देताना योग्य अशी पद्धत स्वीकारण्यात येईल. रासायनिक खतांचा वापर करून भारतामधील व इतर मागासलेल्या देशांतील शेतीच्या पद्धतीत बदल करण्याची अतिशय जरूर आहे. ह्या कामी सरकारी व बिनसरकारी पातळीवर प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

---

## इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा कारखाना

औद्योगिक विकासासाठी लागणाऱ्या शक्तीच्या उत्पादनात वाढ करण्याची गरज भारताला अजून कित्येक वर्षे भासणार आहे. उद्योगधंद्यांसाठी लागणारी विजेची शक्ती निर्माण करण्यासाठी आधुनिक युगात अणुशक्तीचा उपयोग करावा लागणार आहे हे जगातील प्रगत देशातील घडामोडींवरून स्पष्टच झाले आहे, पण अणुशक्तीचा औद्योगिक वापर करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची गरज असते. अणुशक्तीच्या उपयोगात भारताने अद्यापपर्यंत तरी पहिली पाऊलेच टाकलेली आहेत. तथापि, ह्या शक्तीच्या वाढत्या उपयोगाची दिशा लक्षात घेऊन इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा सार्वजनिक मालकीचा एक कारखाना काढण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. त्याच्या उभारणीसाठी १८३ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. आगामी कालातील इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची सर्व गरज कारखाना भागवू शकेल असा अंदाज आहे. ट्रॉम्बे येथील अणुशक्ती संघटनेने अनेक प्रकारची इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे भारतात तयार करता येणे शक्य आहे असे दाखवून दिलेले आहे. ही उपकरणे संरक्षणविषयक प्रयत्नांच्या बाबतीतही फार महत्त्वाची असल्याने त्यांच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताने स्वयंपूर्ण होण्याचे उद्दिष्ट ठेवणे अतिशय अगत्याचे आहेच. भारत सरकारने नेमलेल्या इलेक्ट्रॉनिक्स कमिटीच्या शिफारसीप्रमाणे उभारण्यात यावयाचा हा कारखाना १९७०–७१ च्या सुमारास उत्पादन करू लागेल. अणुशक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करण्याची केंद्रे जसजशी वाढत जातील तसतशी ह्या उपकरणांची मागणी वाढत जाणार आहे. भारत सरकार अणुशक्तीच्या विकासाच्या कार्यक्रमात अनेक अणुभट्ट्या उभारणार आहे. ट्रॉम्बे येथे अशी एक प्रायोगिक अणुभट्टी उभारण्याचे काम चालू आहे.

---

**रूरकेला कारखान्याचा विस्तार**—रूरकेला येथील पोलाद कारखान्याचा विस्तार करण्यासंबंधीचा अहवाल हिंदुस्थान स्टील कंपनीकडून भारत सरकारकडे आला आहे. सध्या त्याचा अभ्यास चालू असून तो पूर्ण झाल्यावर कारखान्याच्या विस्तारासाठी पश्चिम जर्मन सरकारची मदत घेण्याकडे लक्ष देण्यात येईल. अखेरचा निर्णय एक महिन्याच्या अवधीत घेण्यात येईल.

### नर्मदा नदीवरील विकासयोजना अडली

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारतास अनेक नव्या नव्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. नद्यांवरील धरणांचा अगर त्यांच्या खोऱ्यांचा विकास करणाऱ्या योजना हा असाच एक प्रश्न आहे. वास्तविक, पाणीपुरवठ्याच्या योजनांना राज्यांच्या सहकार्याचा लाभ सुलभतेने झाला पाहिजे, पण तसे होत नाही. ह्याचा अर्थ इतकाच की, राज्यांच्या राजकीय सीमारेषा भूगोलाच्या नैसर्गिक सीमारेषांशी जुळत्या नाहीत. नर्मदा नदीच्या खोऱ्याच्या विकासाच्या विविध उद्देशांची योजना गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थान ह्यांना लाभदायक ठरणारी आहे. ह्या योजनेचा पायाभरणी समारंभ पं. नेहरू ह्यांच्या हस्ते १९६१ साली झालेला आहे. त्यानंतर योग्य वेळी कामास प्रारंभ होता तर १९७१ साली योजना पुरी होऊन राबविण्यास प्रारंभ करता आला असता. देशातील सध्याची अन्नधान्याची टंचाई लक्षात घेता ही योजना जितक्या लवकर पुरी होईल तितकी हवी आहे. परंतु संबंधित राज्यांत योजनेसंबंधी मतभेद उत्पन्न झाल्यामुळे आता ती १९७५ पूर्वी होणे दुरापास्त दिसत आहे. ह्या योजनेचा सर्वांत अधिक फायदा गुजरात राज्याला मिळणार आहे. तीमुळे गुजरात राज्यातील ओलिताची जमीन १० लाख, ३५ हजार एकरांवरून ६० लाखापर्यंत वाढणार आहे. गुजरात राज्याला दरसाल १८ लाख टन अन्नधान्याचा तुटवडा पडतो. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश ह्या राज्यांचा नर्मदेवर ५०० फूट उंचीचे धरण बांधण्यास विरोध आहे. कारण, इतक्या उंचीचे धरण बांधण्यात आल्यास दोन्ही राज्यांतील मिळून २ लाख, ८० हजार एकर सुपीक जमीन पाण्यात बुडून जाईल आणि त्यांचा अन्नधान्याचा तुटवडा आणखीच वाढेल.

### "बरोडा बँक कार्ड"

भारतात ब्रिटिश नमुन्याची फ्री क्रेडिट कार्ड सर्व्हिस, बँक ऑफ बरोडा लि. ने सुरू करण्याचे ठरविले आहे. ह्या सोईमुळे, क्रेडिट कार्ड धारकांना बँकेच्या भारतातील कुठल्याही शाखेत जाऊन चेक वटविता येतील. करंट खात्याच्या किंवा चेकची सवलत असणाऱ्या सेव्हिंग्ज खात्याच्या, बँकेने मान्य केलेल्या कुठल्याही खातेदाराला हे कार्ड दिले जाईल. त्यासाठी खात्यातील रकम राखून ठेवली जाणार नाही. तूर्त, क्रेडिट कार्डाखाली जास्तीत जास्त ५०० रु. ची रकम उपलब्ध होईल. खातेदारास दिलेले कार्ड सहा महिने अमलात राहील. बँकेच्या तारतम्याने त्याचे नूतनीकरण केले जाईल. पण ते दुसऱ्याला वर्ग करता येणार नाही. खातेदाराला एका वेळी एकच कार्ड दिले जाईल. कार्डावर खातेदाराची नमुन्याची सही राहील आणि त्या कार्डाच्या अनुरोधाने दिलेल्या चेक्सचे नंबर त्यावर लिहिलेले असतील. बँक अधिकाऱ्याच्या समक्ष खातेदाराला चेकवर सही करावी लागेल.

कार्डाइतकी ठेव खातेदाराने राखली पाहिजे, अशी सामान्यतः अपेक्षा असली तरी लहानसहान रकमांचे, एका आठवड्याच्या आत भरणा केले जाणारे ओव्हरड्राफ्ट दिले जातील. खात्यातील ठेवीची रकम संपून बँकेचा तो देणेकरी झाला, तर ते देणे खातेदार लवकरच देऊन टाकील, अशी बँकेची अपेक्षा आहे. ह्या बँकेच्या येण्यावर चालू दराने (सध्या ९.५% दराने) व्याज आकारले जाईल. तूर्त ह्या योजनेचा प्रयोग बृहन्मुंबईत केला जाईल; तेथे बँकेच्या ३३ शाखा आहेत. अनुभव येईल त्याप्रमाणे योजनेचे क्षेत्र वाढविण्यात येईल; बँकेच्या सर्व म्हणजे सुमारे २४० शाखांतून चेक वटविता येतील.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — : विभागीय कचेरी :

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई — महाल : नागपूर.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१ — तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,६५,६६,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | १,७५,५५,००० |
| ठेवी | ... रु. | ४३,८६,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,००,८६,८१ ००० |

: शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. — श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

"चिरमुले निकेतन", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८–२–६६ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते :— दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

### लोखंडाच्या खाणींचे यांत्रिकीकरण करण्याची सूचना

खनिजे आणि धातू व्यापार मंडळाच्या आमंत्रणावरून दक्षिण भारतामधील लोखंडाच्या खाणींची पाहणी करण्यासाठी एक रशिअन तज्ज्ञ भारतात आला होता. दक्षिण भारतात लोखंडाच्या सुमारे दीडशे खाणी आहेत. त्यांपैकी निदान मोठमोठ्या खाणींचे तरी संपूर्ण यांत्रिकीकरण करावे अशी सूचना रशियन तज्ज्ञाने केली आहे. त्याने आपला प्राथमिक अहवाल आता भारत सरकारला सादर केला आहे. प्रत्येक खाणीसाठी किती व कशा प्रकारची यंत्र-सामग्री लागेल त्याचे दिग्दर्शन अहवालात करण्यात आले असून रुपयाच्या चलनात यंत्रसामुग्री मिळू शकेल असे नमूद करण्यात आले आहे. ह्यासंबंधीचा अखेरचा अहवाल हाती आल्यावर सरकार यांत्रिकीकरणासंबंधी निर्णय घेईल. अशा प्रकारच्या यंत्रसामुग्रीला लाखो रुपये खर्च येतो. सरकारने यांत्रिकीकरणाचा निर्णय घेतला तर यंत्रसामग्रीचा पहिला संच १९६७ च्या मार्चमध्ये भारतात येऊ शकेल. दक्षिण भारतात बेल्लारी-होस्पेट, बंगलोर आणि विजयवाडा विभागात लोखंडाच्या खाणी आहेत. त्यांपैकी १०–१२ खाणींचे वार्षिक उत्पादन २ ते ४ लाख टन असून काही मोठ्या खाणींत १० हजार टनापर्यंत उत्पादन होते. बेल्लारी-होस्पेट विभागातील लोखंडाच्या खाणी जगातील उत्कृष्ट खाणींमध्ये मोडतात. खाणीतील लोखंडाचा अंश ६५ टक्क्यांपेक्षा क्वचित कमी नसतो. शिवाय ही माती घट्ट ढेकळांच्या स्वरूपात असल्यामुळे खोदाईस व उत्पादनास सुलभ आहे. खाणींपैकी काही खाणींतून थोड्याबहुत प्रमाणात यांत्रिकीकरण झालेलेच आहे. पण, पूर्ण यांत्रिकीकरण करण्यात आल्यास उत्पादनात बरीच वाढ होऊ शकेल.

---

### जर्मन रेडिओवरून तामीळ व बंगाली कार्यक्रम

जर्मन रेडिओवरून आग्नेय आशियातील देशांसाठी खास कार्यक्रम प्रसारित करण्यात येत असतात. जर्मन नभोवाणीच्या परदेशीय कार्यक्रमांचा तो एक भाग आहे. चालू वर्षी तामीळ व बंगाली भाषेतील कार्यक्रम नभोवाणीवर नव्याने चालू करण्यात येणार आहेत. सध्या आग्नेय आशियासाठी होणाऱ्या कार्यक्रमांत इंग्लिश, हिंदी व उर्दू ह्या भाषांतील कार्यक्रम रोज प्रक्षेपित करण्यात येत असतात. गेल्या महिन्यापासून संस्कृत भाषेतील कार्यक्रम दर पंधरा दिवसांनी सादर करण्यात येऊ लागला आहे. परदेशी नभोवाणीवरून संस्कृत भाषेत प्रक्षेपित करण्यात येणारा हा पहिलाच कार्यक्रम आहे. कार्यक्रमास सुरुवात होऊन एक महिन्याचाच काळ लोटला असला तरी भारतातील अनेक श्रोत्यांनी पत्रे पाठवून त्याबद्दलची आपली आवड कळविली आहे.

---

### रेल्वे एंजिनांच्या कारखान्यासाठी कर्ज

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळाकडून ६ कोटी डॉलर्सचे कर्ज मिळविण्याचे प्रयत्न रेल्वे खाते करीत आहे. डिझेल विजेवर चालणारी रेल्वेची एंजिने तयार करण्यासाठी लागणारे काही भाग आयात करावे लागतात. हे भाग आयात करण्यासाठी कर्जाचा उपयोग करण्यात येणार आहे. त्याशिवाय रेल्वेच्या विकासाची सध्या चालू असलेली कामे पूर्ण करण्यासाठी जागतिक बँकेकडून ७ कोटी डॉलर्सचे कर्ज मिळविण्याची खटपटही चालू आहे. पहिल्या कर्जाच्या साह्याने वाराणशी येथील एंजिनांच्या कारखान्याचा विस्तारही करण्यात यावयाचा आहे. ह्या कारखान्याला आंतरराष्ट्रीय विकास मंडळाकडून मिळालेले २६ कोटी रुपयांचे कर्ज येत्या ऑगस्टपर्यंत वापरून संपणार आहे. रेल्वेचे एक प्रतिनिधी मंडळ कर्जाच्या कामासाठी लवकरच अमेरिकेला जाणार आहे.

---

### साखरेच्या निर्यातीला आर्थिक मदत

१९६५–६६ साली भारताने ३ लाख टन साखर परदेशी निर्यात केली. ही निर्यात करण्यासाठी सरकारला १७·५ कोटी रुपयांची मदत देशातील साखर धंद्याला द्यावी लागली. निर्यातीमुळे भारताला ११·५० कोटी रुपयांचे परदेशीय चलन प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत साखरेची किंमत भारताच्या साखरेच्या किंमतीपेक्षा कमी असल्यामुळे सरकारला अधिक प्रमाणात मदत द्यावी लागली. प्रथम २·१५ लाख टन साखरेची निर्यात करण्यासाठी १० कोटी रुपयांची मदत देण्याची तरतूद करण्यात आली होती. पण साखरेचे उत्पादन ३२·६९ लाख टनापर्यंत वाढल्याने अधिक साखर निर्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला. चालू वर्षीही ३ लाख टन साखर निर्यात करण्याचे ठरविण्यात आले आहे. निर्यात करण्यासाठी २० कोटी रुपयांची मदत देण्यात येणार आहे. निर्यातीमुळे १३ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळेल असा अंदाज करण्यात आला आहे.

---

**एअर इंडियासाठी दोन नवी विमाने**—भारत सरकारच्या संमतीने एअर इंडिया कॉर्पोरेशनने ७०७ बोईंग जेट ह्या प्रकारच्या दोन नव्या विमानांची मागणी नोंदविली आहे. ही विमाने बहुधा येत्या वर्षअखेर मिळतील. त्यांची किंमत १०·५९ कोटी रुपयापर्यंत असेल. विमानांची किंमत अमेरिकेमधील व्यापारी बँका व बोईंग कंपनी ह्यांच्याकडून कर्ज घेऊन चुकती करण्यात येणार आहे.

**१७ वर्षे लपल्याचे फळ**—गेल्या महायुद्धात फ्रान्सचा पाडाव झाल्यावर अनेक फ्रेंच नागरिकांनी नाझी राजवटीशी स्वेच्छेने अगर अनिच्छेने सहकार्य केले होते. जर्मनीचा पराभव झाल्यावर त्यांतील कित्येक जणांना फासावर लटकाविले गेले. असाच एक फ्रेंच नागरीक १७ वर्षे आपल्या घराच्या माळ्यावर लपून राहिला होता. तो सापडल्यावर त्यालाही मृत्यूची शिक्षा फर्माविण्यात आली. पण, प्रे. डिगॉल ह्यांनी ती कमी करून जन्मठेपेची केली.

**पाकिस्तानलाही गहू हवा**—भारतामधील दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी १ ते १॥ कोटी अन्नधान्याची आयात करावी लागणार आहे. पाकिस्तानलाही त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात भारतासारखीच आयात करावी लागणार आहे. पाकिस्तानला १० लाख टन गहू दिला तर तो पुरेल असा अंदाज प्रथम करण्यात आला होता. परंतु मागाहून केलेल्या दुरुस्त अंदाजाप्रमाणे पाकिस्तानला ३० लाख टन गहू आयात करावा लागेल.

**इंदूर शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई**—मध्य प्रदेशातील औद्योगिक शहर म्हणून ख्यातनाम असलेल्या इंदूर शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्रतेने भासत आहे. कॉर्पोरेशनने शहरात ४८ ट्यूब विहिरी खोदण्याची योजना हाती घेतली आहे. त्यांतील काही विहिरींना पाणी लागले असून ते पिण्यासाठी उपयोगी आहे की नाही ह्याची तपासणी करण्यात येत आहे. इंदूर शहराची वस्ती ४ लाख आहे.

# सरदारगृह

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्टये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३९३३७ ]　सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई, २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

# सारस्वत
## को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११·६९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६·०७ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४४७·०० ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४८६·०० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले

"विजय" नांगर

वापरा. ४, ६ व ८ बैली

फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



विजय पंपींग सेट

३ हॉ. पॉ. - २ × २½
५ हॉ. पॉ. - २½ × ३

शेतीकरिता मजबूत व कार्यक्षम कोणत्याहि मेकच्या मोटारीला जोडून विजय पंप सेट वापरा

कारखानदार न्यू विजय इंडस्ट्रीज लि. विश्रामबाग, सांगली (महाराष्ट्र)

१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )




# ठाकरसी फॅब्रिक्स


फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड ·SANFORIZED·

THACKERSEY FABRICS

सूटिंग, शर्टिंग, सुंदर, साधे आणि डिझाइन्सचे, तऱ्हेतऱ्हेचे कापड असे हे आवडते पुरुषांचे

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स** •धी क्राउन स्पिनिंग अ‍ॅण्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •धी हिंदुस्तान स्पिनिंग अ‍ॅण्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



*Make doubly sure by fitting*

**GADRE BANDHU**

MADHAVNAGAR (S.R.)

INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## १९६३–६४ मधील सहकारी पतपेढ्या

### रिझर्व्ह बँकेचा आढावा

सहकारी पतपेढ्यांची संख्या आणखी कमी झाली; २,३४,०६२ ची ती २,३२,९६१ झाली.

एकूण पतपेढ्यांपैकी निम्म्या पतपेढ्या उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, आंध्र प्रदेश आणि बिहार ह्या पाच राज्यांत आहेत.

प्राथमिक पतपेढ्यांच्या सभासदांची संख्या २४·५७ लक्षांनी (८%) वाढून ती ३२०·३१ लक्ष झाली.

सर्व पतपेढ्यांचे मिळून स्वतःच्या मालकीचे भांडवल २६२·६० कोटी रु. चे ३२६·१३ कोटी रु. झाले आणि खेळते भांडवल १३८४·६४ कोटी रु. चे १६४८·३४ कोटी रु. झाले.

सर्व प्राथमिक पतपेढ्यांनी मिळून १९६३–६४ मध्ये ५२३·०६ कोटी रु. ची कर्जे दिली; म्हणजे १९६३–६४ च्या मानाने ७७·२१ रु. ची कर्जे अधिक दिली.

### राज्य सहकारी बँका

राज्य सहकारी बँकांची संख्या २१ च राहिली; त्यांचे खेळते भांडवल २८१·५१ कोटी रु. चे ३२८·२१ कोटी रु. झाले. त्यापैकी निम्म्याहून जास्त खेळते भांडवल (१६३·६६ कोटी रु.) रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे होते. सर्व राज्य सहकारी बँकांत महाराष्ट्राची केंद्रीय बँक सर्वांत मोठी (६९·०८ कोटी रु. खेळते भांडवल) होती.

### मध्यवर्ती सहकारी बँका

मध्यवर्ती सहकारी बँकांची संख्या ३७५ ची ३७२ झाली; सभासद संख्या २५,६५५ ने उतरून ३,६५,००९ वर आली; खेळते भांडवल ६५·४७ कोटी रु. नी वाढून ते ४६०·३२ कोटी रु. झाले. त्यापैकी १७२·२७ कोटी रु. च्या ठेवी होत्या. ५२९·१४ कोटी रु. कर्जापैकी ४९७·७४ कोटी रु. ची अल्प-मुदतीची आणि ३१·४० कोटी रु. ची मध्यम मुदतीची होती. येण्यापैकी थकबाकी ५५·५१ कोटी रु. (१५·७%) होती.

### शेतकी पतपेढ्या

२,०९,६२२ प्राथमिक शेतकी पतपेढ्यांचे २३७·२८ सभासद होते; त्यांचे खेळते भांडवल ४४०·३९ कोटी रु. होते. खेळत्या भांडवलाशी ठेवींचे प्रमाण फक्त ५·९% पडले. १,६५,५५४ पतपेढ्यांनी मिळून १९६३–६४ मध्ये २९७·१४ कोटी रु. ची कर्जे १०९·१९ लक्ष सभासदांना दिली. म्हणजे, प्रत्येक कर्जदाराला सरासरीने २७२ रु. कर्ज मिळाले. ह्या पतपेढ्यांची थकबाकी ७७·३१ कोटी रु. (त्यांच्या येण्याच्या २२·५%) होती.

### बिगर–शेती पतपेढ्या

बिगर-शेतकी पतपेढ्यांत मुख्यतः अर्बन बँका आणि नोकर-वर्गाच्या पतपेढ्यांचा समावेश होतो. त्यांची संख्या १३,३२३ होती व त्यांचे खेळते भांडवल २१७·८५ कोटी रु. होते. त्यापैकी १३५·९५ कोटी रु. च्या ठेवी होत्या.

### लँड मॉर्गेज बँका

मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांची संख्या १८ होती. त्यांचे खेळते भांडवल ११४·१३ कोटी रु. होते. त्यापैकी ९२·५९ कोटी रु. ची डिबेंचर्स होती. प्राथमिक लँड मॉर्गेज बँका ५८३ होत्या.

### राज्य सरकारांचे भाग भांडवल

सर्व प्रकारच्या पतपेढ्यांच्या भागभांडवलांत राज्य सरकारांचा वाटा ३८·२१ कोटी रुपयांचा आहे. त्याची वर्गवारी अशीः— राज्य सहकारी बँका ८·८६ कोटी रु., मध्यवर्ती सहकारी बँका १५·९७ कोटी रु. शेती पतपेढ्या ९·०० कोटी रु., बिगरशेती पतपेढ्या ०·०५ कोटी रु. आणि मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँका ४·३४ कोटी रु.

### सहकारी सोसायट्यांचे तुलनात्मक आकडे

(आकडे लक्ष रुपयांचे)

| सोसायटीचा प्रकार | संख्या | सभासद (हजार) | खेळते भांडवल | कर्जे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिलेली | परतफेड | येणे | थकबाकी |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **सर्व पतपेढ्या** | **२,३२,९६१** | **३,२६,९६** | **१६,४८,३४** | **५,२३,०६** | **४,३३,७९** | **५,४८,२७** | **९१,५४** |
| **अ अल्प मुदत** | | | | | | | |
| १. राज्य सहकारी बँक | २१ | २३ | ३,२८,२१ | ३,१७,८७ | २,९०,७७ | २,४१,२३ | ६,७९ |
| २. मध्यवर्ती सहकारी बँका | ३७२ | ३,६५ | ४,६०,३२ | ५,२९,१४ | ३,७८,४१ | ३,४०,१० | ५३,५० |
| ३. औद्योगिक सहकारी बँका | १५ | १० | ६,०१ | ८,३६ | ७,७२ | ३,४६ | ८४ |
| ४. प्राथमिक पतपेढ्या | | | | | | | |
| (अ) शेतकी | २,०९,६२२ | २,३७,२८ | ४,४०,३९ | २,९७,१४ | २,४६,७६ | ३,४२,९३ | ७७,३१ |
| (ब) धान्य पेढ्या | ९,००७ | १३,४८ | ७,३५ | ३,१४ | २,६५ | ५,७७ | २,७५ |
| (क) बिगर शेतकी | १३,३२३ | ५६,७७ | २,१७,८५ | १,९९,५७ | १,७८,६७ | १,६६,६९ | ९,३० |
| **ब दीर्घ मुदत** | | | | | | | |
| १. मध्यवर्ती लँड मार्गेज बँका | १८ | २,६७ | १,१४,१३ | २९,५८ | ७,३३ | ९०,१८ | १,९२ |
| २. प्राथमिक लँड मार्गेज बँका | ५८३ | १२,७८ | ७४,०८ | २३,२१ | ५,७१ | ६८,८८ | २,१८ |

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**७०७ बोइंग कसे कोसळले ?**—एअर इंडिया इंटर नॅशनलचे 'कांचनगंगा' हें ७०७ बोइंग विमान मॉं ब्लॉं ह्या पर्वतशिखरावर कोसळल्यानंतर विमानाचे अवशेष शोधण्याचे काम अविरत बर्फवृष्टीमुळे स्थगीत करण्यात आले होते. अवशेष शोधण्याचे काम करणाऱ्या फ्रेंच पहाडी संशोधकांना अपघाताच्या स्थळी सापडलेले विमानाचे काही अवशेष ह्या विमानाचे नसावेत अशी शंका येत आहे. त्यामुळे हा अपघात रहस्यमय होऊ पाहात आहे.

**अन्नसत्त्वाच्या गोळ्यांची देणगी**—भारतामधील दुष्काळग्रस्त लोकांना देण्यासाठी डेन्मार्कने १ कोटी अन्नसत्त्वाच्या गोळ्या देणगी म्हणून दिल्या आहेत. डेन्मार्कमधील आंतरराष्ट्रीय चर्च मदत संघटनेने गोळ्या देण्याच्या कामी पुढाकार घेतला होता. ९० लाख गोळ्या आंध्र, म्हैसूर, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेश राज्यांतील दुष्काळग्रस्तांत वाटण्यात येतील व १० लाख राखीव साठा म्हणून ठेवण्यात येतील.

**स्त्रियांनी पूल बांधला**—गढवाल जिल्ह्यातील स्त्रियांनी एका नदीवर ८५ फूट लांबीचा पूल बांधला आहे. पुलाच्या बांधणीसाठी त्यांना ३ वर्षेपर्यंत कष्ट करावे लागले. गावातील बहुतेक पुरुष दूरवर शहरात कामाला गेलेले असल्याने पूल बांधण्याच्या कामी स्त्रियांनाच पुढाकार घ्यावा लागला. पुलाला लागणाऱ्या काही लोखंडी तुळया त्यांनी १५ मैलांवरून वाहून आणल्या. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अंदाजाप्रमाणे पुलाची किंमत ५० हजार रुपये आहे.

**दूरदर्शनाच्या यंत्रांची आयात**—भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने युगोस्लाव्हियाकडून दूरदर्शनाची २,००० यंत्रे आयात करण्याचे ठरविले आहे. सर्व सेट्स सुमारे तीन महिन्यांत भारतात येतील असा अंदाज आहे. दूरदर्शनाच्या माध्यमाचा उपयोग मागासलेल्या देशांत शिक्षणाच्या प्रसारासाठी चांगला होऊ शकतो. पुढारलेल्या देशांत मात्र ह्या माध्यमाला मनोरंजनाचे साधन म्हणून महत्त्व आलेले आहे.


# अल्पबचत योजना आता अधिक लाभदायक

पोस्ट ऑफिस बचत बँकेची खाती

वैयक्तिक खात्यावरील २५ हजार रुपयांपर्यंत व संयुक्त खात्यावरील ५० हजार रुपयांपर्यंतच्या ठेवीवर करमुक्त ४ टक्के व्याज. कितीही वेळा पैसे काढता येतात. चेकबुकची सोय उपलब्ध. सार्वजनिक संस्थांच्या खात्यावर सरसकट ३½ टक्के करमुक्त व्याज व पैसे ठेवण्याला मर्यादा नाहीं.

आता व्याजाचा दर 4%

## संचित मुदतीच्या ठेवीची योजना

१ एप्रिल १९६५ रोजी अथवा त्यानंतर उघडण्यात येणाऱ्या संचित मुदतीच्या खात्यावर आता मुदतीअंती करमुक्त बोनसही मिळेल.

दरमहा १० रुपये जमा करणाऱ्यास ५ वर्षांच्या खात्यावर १५ रुपये, १० वर्षांच्या खात्यावर ५० रुपये आणि १५ वर्षांच्या खात्यावर १०० रुपये बोनस मिळेल. सर्व ठेवींच्या बाबतीत याच प्रमाणात बोनस मिळेल. १० आणि १५ वर्षांची खाती उघडणाऱ्या व्यक्तींना प्राप्तीकरात सवलत मिळते.

आता बोनसही मिळेल

## नवीन ८% बचत योजना

### राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटे

[प्रारंभिक विक्री]

ही सर्टिफिकिटे १०, १०० आणि १००० रुपयांच्या दर्शनी किंमतीत बचत बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व पोस्ट ऑफिसातून १ जून १९६५ पासून विकत मिळतील.

या सर्टिफिकिटांची मुदत १० वर्षांची राहील व मुदतीअंती त्यावर ८ टक्के दराचे व्याज मिळेल. म्हणजे १००० रुपयांचे १८०० रुपये मिळतील. व्याजावर प्राप्तीकर आकारला जाईल.

पांच वर्षे मुदतीचे बिनव्याजी बक्षीस रोखे देऊन त्याबद्दल तुम्हांला ही सर्टिफिकिटे घेता येतील.

## करमुक्त उत्पन्नासाठी पुढील दीर्घ मुदतीच्या सर्टिफिकिटांत पैसे गुंतवा

* १० वर्षांची डिफेन्स डिपॉझिट सर्टिफिकिटे. यावर ४.५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.
* १२ वर्षांची राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटे. यावर ६.२५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.

SMALL SAVINGS SS SERVE THE STATE & YOUR FAMILY

राष्ट्राच्या विकासासाठी आणि तुमच्या सुरक्षिततेसाठी अल्पबचतीत अधिकाधिक रक्कम गुंतवा

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई-३२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.